जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 SEP 2026
तरुण भारत



कोल्हापूर : प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठात प्रबोधनकार ठाकरे जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये गुरूवारी सकाळी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणाने अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राज्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, उपकुलसचिव दिपक अडगळे, सहाययक कुलसचिव सुरेश बंडगर, विनोद लोखंडे, सुनिल वाजे, कुलदिप औटे, अवधूत गंगधर आदींसह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 SEP 2026
पुढारी

# मॉस्कोतील आंतरराष्ट्रीय परिषदेत शिवाजी विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



प्राजक्ता डवरी



वैभव कदम

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेचे विद्यार्थी वैभव कदम आणि प्राजक्ता डवरी यांची मॉस्को येथे आयोजित 'आंतरराष्ट्रीय रसोफिल चळवळी'च्या चौथ्या परिषदेसाठी निवड झाली. प्राजक्ता रशियन भाषा एम.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी असून, वैभव रशियन भाषा पदविका अभ्यासक्रमाचा विद्यार्थी आहे.

परिषदेसाठी विद्यार्थ्यांचा हवाई प्रवास, निवास व इतर खर्च आयोजकांकडून करण्यात आला आहे. ऐतिहासिक स्मृती, रशियन इतिहास, संस्कृती आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संवाद या विषयांवर परिषदेत चर्चा होत आहे. यापूर्वीही विभागातील आठ विद्यार्थ्यांनी मॉस्कोतील रशियन पीपल्स फ्रेंण्डशिप विद्यापीठाच्या समर कोर्समध्ये सहभाग घेतला आहे. रशियन भाषा शिक्षिका डॉ. मेघा पानसरे, ज्योती पाटील, डॉ. अक्षय सरवदे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.